# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक

**विषय :– " भारतरत्न जे.आर.डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती" योजनेच्या अर्जास मुदतवाढ देणेबाबत.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क्र. ६१/२०२३, दि. २४/०४/२०२३ अन्वये पीएच्.डी. अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१९–२० मध्ये दि. ०१/०८/२०१९ ते ३०/०८/२०२१ या कालावधीमध्ये नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांकडून भारतरत्न जे.आर.डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजनेकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले होते. सदर शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

भारतरत्न जे.आर.डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या **http://bcud.unipune.ac.in** या लिंकवर Ph.D. Tracking पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यास **दि. १५/०७/२०२३** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच यापूर्वी ऑनलाईन पद्धतीने अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत कागदपत्रासहित तसेच मार्गदर्शक व मा. विभागप्रमुख/मा. प्राचार्य यांच्या शिफारशीसह (सही व शिक्का) **दि. १८/०७/२०२३** पर्यंत शैक्षणिक प्रवेश विभागात प्रत्यक्ष हस्तपोच सादर करावेत. सदर अर्जास मा. विभागप्रमुख/मा. प्राचार्य यांनी Ph.D. Tracking लॉगीन मधून सदर अर्जास अप्रुव्हल देण्यात यावे. मुदतीनंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**उपकुलसचिव**
**शैक्षणिक प्रवेश विभाग**

गणेशखिंड, पुणे – ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/३०१८
दिनांक : ०६/०७/२०२३

प्रत :– माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी
मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग/ मा. प्राचार्य/ मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

सदर परिपत्रक आपल्या विभागातील/संशोधन केंद्रातील सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

D/Vishnu/JRD TATA/TRD TATA Circular

Scanned by CamScanner